# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Stolen Property**

**Police Station** :- **Malegaon**

**Date of Good Work done** :- **18/10/2021**

**Brief of the work done :-**

पोलीस स्टेशन मालेगाव हद्दीतून मोटार सायकल चोरीची घटना घडल्यानंतर ठाणेदार श्री. धुमाळ यांनी व अंमलदार यांनी शिताफीने तपास करून अवघ्या 24 तासात अकोला येथून मोटार सायकल सह आरोपीस अटक केले आहे.

पुण्य नगरी

## मोटरसायकल चोरटा गजाआड

**मालेगाव** : शहरातील प्रभाग क्रमांक ६ मधून १६ ऑक्टोंबरच्या रात्री दरम्यान चोरट्यांनी एक लाख रुपये किंमतीची पल्सर मोटर सायकल चोरून नेली होती. याप्रकरणी मालेगाव पोलिसांनी जलद गतीने तपास लावून अवघ्या चोवीस तासाच्या आत अकोला येथून चोरलेली मोटरसायकल सह आरोपीस गजाआड केले.

प्रभाग क्रमांक ६ मधील आजाद खा पठाण यांची एम.एस.-३७-ए.बी.०४०५ क्रमांकची दुचाकी चोरून नेली होती. याबाबत ठाणेदार प्रवीण धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकाँ ज्ञानदेव भगत गजानन झगरे यांनी अकोला पोलिसांना माहिती दिली. यावरून डाबकी रोड पोलीस स्टेशनच्या पोलिसांनी सदर संशयास्पद मोटरसायकल व युवक अकोल्यात जास्त असल्याची माहिती दिली. सदर घटनेची माहिती मिळताच पोहेकाँ ज्ञानदेव भगत गजानन झगरे यांनी अकोला गाठून आरोपी विशाल अंभोरे (वय २०) रा.वेणी ता. लोणार जि. बुलडाणा यास मोटरसायकल ताब्यात घेऊन मालेगावला आणले.त्याला न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्याची न्यायालयीन कोठडीत रवानगी केली.

**Smart Bhandara-Gondiya**
Page No.4 October 18, 2021